**Publication:** Tarun Bharat
**Date:** 12/09/2013
**Edition:** Nagpur
**Page No:** 12
**Headline:** Nagpur is coming out as an Education hub

# नागपूर 'एज्युकेशनल हब' म्हणून उदयास येतेय्

## आजची पिढी संगणकाप्रमाणे 'सुपरफास्ट': गिरी बालसुब्रमण्यम

तभा वृत्तसेवा
नागपूर, ११ सप्टेंबर

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने प्रचंड वेगाने भरारी घेतली असून, देशातील लहान-मोठी शहरे देखील या प्रगतीच्या लाटेवर स्वार होत विविध क्षेत्रांत प्रगती करीत आहेत. आज नागपूरसारख्या मध्यवर्ती शहरातील अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या, येथून तयार होणारे गुणवत्तापूर्ण विद्यार्थी लक्षात घेता नागपूर 'एज्युकेशनल हब' म्हणून उदयास येत असल्याचे गौरवोद्गार उत्कृष्ट सूत्रसंचालक 'पिक ब्रेन' उर्फ गिरी बालसुब्रमण्यम यांनी काढले.



एका खाजगी संस्थेद्वारे आयोजित कार्यक्रमानिमित्त गिरी बालसुब्रमण्यम नागपुरात आले असता, त्यांनी तभाशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नागपुरातील शैक्षणिक विकासासोबतच आजची नवीन पिढी, त्यांची आकलनशक्ती, तंत्रज्ञान, मुलांचा झपाट्याने होणारा बौद्धिक विकास आदी मुद्यांवर प्रकाश टाकला.

नवीन पिढीच्या जलद आकलनशक्तीबाबत गिरी म्हणाले की, आजची पिढी ही संगणकाप्रमाणे 'सुपरफास्ट' झाली आहे. संगणकामध्ये असलेली गती, अचूकता यांचा पुरेपूर संगम आहे. ज्याप्रमाणे संगणकाद्वारे अनेक कामांना सोयीस्कर करता येते, त्याचप्रमाणे मुलांमधील गती त्यांच्यासमोरील अनेक आव्हानांना समोर जाण्यासाठी त्यांना सक्षम करत असते. आज संगणक आणि नवीन पिढी यामध्ये काहीही अंतर राहिलेले नाही असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

आजची पिढी ही औद्योगिकतेकडे, तंत्रज्ञानाकडे अधिक आकृष्ट होत आहे. त्यांच्यात दररोज येणारे नवनवे तंत्रज्ञान समजून घेण्याची लालसा आहे. मात्र, दुर्दैवाने आपली शिक्षणव्यवस्था ही या मुलांच्या अपेक्षांना, इच्छांना न्याय देऊ शकत नाही. विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाप्रती असलेल्या आकर्षणाचे करीअरमध्ये रूपांतरण करता येऊ शकेल अशा शिक्षणव्यवस्थेची गरज आहे. भारतीय विद्यार्थी माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अव्वल ठरत असून, त्यांना शालेय जीवनापासूनच अद्ययावत तंत्रज्ञानाविषयी शिक्षण द्यायला हवे, असे स्पष्ट मत गिरी यांनी यावेळी मांडले.

### आजची पिढी 'सेल्फ थॉट'

किशोरवयीन मुले तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन दुरुपयोग करतात याबाबत विचारले असता गिरी म्हणाले, घरातील मोठी माणसे जी कामे करू शकत नाही ती कामे चिमुकले तंत्रज्ञानाच्या मदतीने सहज करतात. त्यांना हे सर्व काही पुस्तकात शिकविले जात नाही. याचाच अर्थ आजची पिढी ही 'सेल्फ थॉट', चिकित्सक आणि समंजस आहे. प्रत्येक गोष्टीला चांगल्या-वाईट अशा दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाचा वापर कुणी, कसा करावा हे उपयोग करणाऱ्यावर अवलंबून आहे. नवीन पिढीला त्यांच्यासाठी काय चांगले, काय वाईट आहे हे चांगल्याप्रकारे समजते.

**Publication:** Tarun Bharat
**Date:** 12/09/2013
**Edition:** Nagpur
**Page No:** 13
**Headline:** Shouvik De and Kshitiz Gupta from Centre Point School won Smart Tech Wizard 2013

# सेंटर पॉईंट स्कूलचे शौविक डे, क्षितिज गुप्ता ठरले नागपूरचे 'स्मार्ट टेक विझार्ड २०१३'

तभा वृत्तसेवा
नागपूर, ११ सप्टेंबर

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे नागपुरात आयोजित 'टीसीएस आयटी विझ २०१३' या स्पर्धेमध्ये सेंटर पॉईंट स्कूलच्या शौविक डे (इयत्ता दहावी) आणि क्षितिज डे (इयत्ता आठवी) या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त करत प्रथम क्रमांक पटकाविला. भवन्स बी. पी. विद्या मंदिरच्या विश्वरूप खानोरकर आणि शहादाब खान या विद्यार्थ्यांना द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले.

डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह येथे पार पडलेल्या भारतातील सर्वात मोठ्या आंतरशालेय स्पर्धेमध्ये नागपुरातील विविध शाळांमधील इयत्ता आठ ते बारावीतील ११०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यापैकी अंतिम फेरीसाठी प्राथमिक परीक्षेतून सहा संघांची निवड करण्यात आली. अंतिम फेरीतील विजेत्यांना टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस मुंबईचे उपाध्यक्ष आणि बिझनेस ऑपरेशन प्रमुख चैतन्य साठे यांच्या हस्ते टॅबलेट, मानचिन्ह, डबल डेकल बीम बॅग, हेडफोन, युएसबी पेन ड्राईव्ह, नोटबुक स्पीकर्स, टी-शर्ट देण्यात आले. याशिवाय उपविजेता आणि अन्य चार संघांनाही पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.




अंतिम फेरीत विजेते ठरलेल्या सेंटर पॉईंट स्कूलचे शौविक डे, क्षितिज गुप्ता यांना मानचिन्ह देताना चैतन्य साठे

नागपूर येथे पार पडलेल्या या स्पर्धेतील विजेते आता महाअंतिम फेरीसाठी नागपूरचे प्रतिनिधित्व करणार असून, 'स्मार्ट टेक विझार्ड २०१३'चा बहुमान मिळविण्यासाठी लढणार आहेत. यावर्षी टीसीएस आयटी विझ स्पर्धा हैदराबाद, अहमदाबाद, कोलकाता, बंगलुरू, चेन्नई, कोईम्बतूर, पुणे, नागपूर, इंदूर, भुवनेश्वर, कोची, लखनऊ, मुंबई, दिल्ली या १४ शहरांमध्ये आयोजित करण्यात आली आहे. या सर्व केंद्रांतून विजेत्या ठरलेल्या संघांमध्ये महाअंतिम फेरी होणार आहे.

यावेळी नागपुरातील विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थी, शिक्षकांची उपस्थिती आकर्षण केंद्र होते. शालेय विद्यार्थ्यांचा ओसंडून वाहणारा 'उत्साह वाखाणण्याजोगा होता. यावेळी प्रेक्षकांमध्ये उपस्थित विद्यार्थ्यांनाही विविध पारितोषिके देण्यात आली. तसेच प्रश्नमंजूषा स्पर्धेचे सूत्रसंचालन करणाऱ्या गिरी बालसुब्रमण्यम यांनी विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले. स्पर्धेची सांगता राष्ट्रगीताने झाली. ■